MHLA160010462022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५९/२०२२**
**शासन वि. जितेंद्रकुमार व ईतर**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे बियाणे अधिनियम १९६६ चे कलम १९ (अ) (१), ७ (ब) आणि बियाणे नियम १९६८ चे नियम ७ व ८ च्या भंगाकरिता फिर्याद म्हणून दि.१०/१०/२०२२ रोजी दाखल आहे. परंतु फिर्यादी हा नियमित गैरहजर आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर प्रकरणामध्ये उचित कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे प्रकरण विनाकारण व विनाप्रगती प्रलंबित आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपी क्र.१ ते ६ यांना समन्सची आणि आरोपी क्र.७ व ८ यांना वॉरंटची बजावणी होत नाही. भविष्यात सुध्दा आरोपींना समन्सची व वॉरंटची बजावणी होण्याची शक्यता नाही. फिर्यादीने त्याकरिता कसूर केला. फिर्यादी नियमित गैरहजर असल्याने आणि प्रकरणामध्ये प्रगती नसल्याने सदर प्रकरण भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७९ प्रमाणे सदर फिर्याद खारीज करून आरोपींना दोषमुक्त करणे उचित ठरेल. यथास्थितीत फिर्यादीच्या कसुरामुळे फिर्याद खारीज करण्यात येते आणि आरोपी क्र.१ ते ८ यांना उपरोक्त गुन्ह्यातून दोषमुक्त करण्यात येते.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:33:48 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**
**दिनांक – १३–०३–२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**